राजभाषा संचालनालय
गोंय सरकार
1 ली लिफ्ट, 5 वो माळो, जुंता हावस, पणजी गोंय
Phone No. : 0832-2420179/2420071(Fax)

राजभाषा संचालनालय
गोवा सरकार
1 ली लिफ्ट, 5 वा मजला, जुंता हावस, पणजी गोवा
Website : www.dol.goa.gov.in

DIRECTORATE OF OFFICIAL LANGUAGE
GOVERNMENT OF GOA
1ST LIFT, 5TH FLOOR,
JUNTA HOUSE, PANAJI-GOA
e-mail : dir-dol.goa@nic.in

No. 13/4/2023/DOL/BPY/ Date: 01/08/2023

गोवा सरकारच्या राजभाषा संचालनालयाच्या भाषा पुरस्कार योजने अंतर्गत कोंकणी, मराठी आणि संस्कृत भाषांच्या उन्नतीसाठी आणि प्रसारासाठी भरीव योगदान दिलेल्या गोव्यातील भाषा विद्वानांना देण्यात येणाऱ्या भाषा पुरस्कारासाठी वर्ष 2019-20, 2020-21 आणि 2021-22 या तीन वर्षांसाठी व्यक्ती/सर्वसामान्य नागरिक/संस्था यांच्याकडून नामांकने मागविण्यात येत आहेत.

मूळ गोमंतकीय असलेल्या गोव्यात राहणाऱ्या आणि अनुवाद, विद्यादान, लेखन इत्यादींद्वारे भाषेचा विकास आणि प्रसारासाठी किमान 50 वर्षे भरीव योगदान दिलेल्या व्यक्तींच्या नावांची खालील पुरस्कारांसाठी शिफारस करता येईल.

अ) Durgaram Upadhe Sanskrit Bhasha Puraskar (दुर्गाराम उपाध्ये संस्कृत भाषा पुरस्कार), आ) Dyanpeeth awardee Ravindra Kelekar Konkani Bhasha Puraskar (ज्ञानपीठकार रविंद्र केळेकर कोंकणी भाशा पुरस्कार), आणि इ) B.D. Satoskar Marathi Bhasha Puraskar (बा. द. सातोस्कर मराठी भाषा पुरस्कार).

या योजनेविषयीचा तपशील राजभाषा संचालनालयाच्या कार्यालयातून प्राप्त करता येईल. नामांकने विहित अर्जाच्या फॉर्ममध्ये सर्व आवश्यक दस्तऐवजांसह सादर करावी. जर एखादी संस्था/संघटना एखाद्या व्यक्तीच्या नावाची शिफारस करीत असेल तर संस्थेचा शिक्का आणि अधिकृत व्यक्तीच्या स्वाक्षरीसह संस्थेच्या लेटर हेडवर प्रस्ताव सादर करावा.

नामांकन अर्ज वरील पत्त्यावर उपलब्ध असून पूर्ण भरलेले अर्ज सर्व आवश्यक दस्तऐवजांसह दि. 25 ऑगस्ट, 2023 पर्यंत वरील पत्त्यावर कामकाजाच्या दिवसांमध्ये सादर करावे.

या वर्षादरम्यान सदर योजनेतील एखाद्या कलमामध्ये सुधारणा केल्यास प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क सरकारकडे राहील आणि संबंधित अर्जदारावर तो बंधनकारक राहील.

सही/-

**राजू वि. गावस**
संचालक, राजभाषा संचालनालय
आणि सरकारचा पदसिद्ध संयुक्त सचिव